


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४० ■ मंगळवार, दि. १० मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



# देशात आजपासून 'एस्मा' लागू !

## इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा निर्णय; आंदोलनांवर बंदी

वृत्तसंस्था १० मार्च

**नवी दिल्ली :** मध्य आशियातील वाढत्या तणावाचे पडसाद आता भारताच्या इंधन पुरवठ्यावर उमटू लागले आहेत. एलपीजी सिलिंडर आणि पेट्रोलियम उत्पादनांची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने आजपासून संपूर्ण देशात अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा (एस्मा) लागू केला आहे. याचबरोबर युद्धजन्य परिस्थितीमुळे जेव्हा एखाद्या वस्तूचा पुरवठा विस्कळीत होतो, तेव्हा बाजारात त्या वस्तूची साठेबाजी आणि काळाबाजार वाढण्याची शक्यता असते. हे रोखण्यासाठी सरकार या कायद्याचा आधार घेते.

या कायद्यामुळे इंधन पुरवठ्याशी संबंधित असलेले कर्मचारी आता कोणत्याही प्रकारचे आंदोलन किंवा संपावर जाऊ शकणार नाहीत. यामुळे गॅस आणि पेट्रोलचा पुरवठा विस्कळीत होणार नाही याची खात्री सरकारला करता येईल. सरकार कोणत्याही वस्तूचा साठा, वितरण आणि विक्रीवर मर्यादा घालू शकते. सध्या एलपीजी बाबत हेच घडत आहे. व्यापारी किंवा विक्रेते जास्त नफ्यासाठी गॅस सिलिंडरचा साठा करून ठेवू शकत नाहीत. तसे आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होतो. सरकार जीवनावश्यक वस्तूंची कमाल विक्री किंमत निश्चित करू शकते, जेणेकरून टंचाईच्या काळात ग्राहकांची लूट होणार नाही.

सरकारने हा निर्णय सामान्य जनतेच्या सोयीसाठी घेतला आहे, जेणेकरूनरुग्णालये आणि घरगुती वापरासाठी लागणारा गॅस वेळेवर उपलब्ध होईल. मात्र, टंचाईच्या अफवा पसरवून साठेबाजी करणाऱ्यांवरही आता सरकारची करडी नजर असणार आहे. तेल कंपन्यांना इतर उत्पादने कमी करून केवळ एलपीजी उत्पादनावर भर देण्याचे आदेश या कायद्यांतर्गत दिले गेले आहेत.

आता केंद्र सरकारने देशभरात एस्मा कायदा लागू केला आहे. जेणेकरुन घरगुती **LPG** अर्थात गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल. तेल शुद्धीकरण कारखाने आणि पेट्रोकेमिकल कंपन्यांना जास्त प्रमाणात एलपीजी उत्पादन करण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत.



### मध्यपूर्वेतील संघर्षाचा फटका

अमेरिका - इस्त्रायलने इराणविरुद्ध युद्ध सुरु केल्याने आखाती देशातील अमेरिका आणि इस्त्रायलच्या लष्करी तळ तसेच इतर ठिकाणांवर इराणकडून हल्ले केले जात आहे. इराणकडून होर्मुज समुद्रधुनी देखील अद्याप सुरळीत न केल्याने जगात इंधन आणि नैसर्गिक गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. भारतात व्यावसायिक आणि घरगुती गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी नागरिक गॅससाठी रांगा लावताना दिसत आहेत. सरकारने एस्मा कायदा लागू केल्याने देशात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहणार आहे.

गेल्या ११ दिवसांपासून अमेरिका - इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध छेडले आहे. यामुळे जगातील खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. पुरवठा विस्कळीत झाल्याने महाराष्ट्रासह देशात याची घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे. यापार्श्वभूमीवर केंद्र सरकाराने देशात एस्मा कायदा (Eesntialed Commûdties Act, १९५५) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे देशात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजारास आळा बसणार आहे.

### युद्ध कधी संपवायचे हे आम्ही ठरवणार!

मध्य पूर्वेतील तणाव सध्या तरी निवळेल असे चित्र नाही. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधीलयुद्ध लवकरच संपेल, असे विधान केले होते. मात्र, त्यांच्या या विधानावर थेट प्रत्युत्तर देताना, 'युद्ध कधी संपवायचे, हे अमेरिका नाही, तर आम्ही ठरवू,' असे इराणने म्हटल आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

### पीएनजी आणि सीएनजीला १०० टक्के पुरवठा!

घरगुती पीएनजी, वाहतुकीसाठी सीएनजी आणि एपीजी उत्पादनाला प्राधान्याने गॅस पुरवठा केला जाईल. तसेच खत उद्योगांना मागील ६ महिन्यांच्या सरासरी वापराच्या ७०टक्के गॅस पुरवठा सुनिश्चित केला जाईल. चहा उद्योग, उत्पादन क्षेत्र आणि इतर औद्योगिक ग्राहकांना ८० टक्क्यांपर्यंत गॅस पुरवठा केला जाईल. पेट्रोकेमिकल उद्योग आणि काही वीज प्रकल्पांमध्ये गॅस पुरवठ्यात कपात करून प्राधान्य क्षेत्रांना वळवले जाऊ शकते. महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि न्याय्य वितरणासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

### पेट्रोकेमिकल कंपन्यांना निर्देश?

घरात जेवण बनवण्यासाठी लागणाऱ्या गॅसचा पुरवठा विनाअडथळा सुरु रहावा, यासाठी केंद्र सरकारने जीवनावश्यक वस्तू कायद लागू केला आहे. त्यांनी रिफायनरीज आणि पेट्रोकेमिकल कंपन्यांना एलपीजीचे अधिकाधिक उत्पादन करण्याचे आणि प्रमुख हायड्रोकार्बन स्रोतांना एलपीजी पूलकडे वळवण्याचे निर्देश दिले आहेत.

### 'एस्मा' म्हणजे काय?

जीवनावश्यक वस्तू कायदा (एस्मा) काही सेवांची डिलीवरी सुनिश्चित करण्यासाठी बनवला आहे. या सेवा लोकांच्या सामान्य जीवनाशी संबंधित आहेत. या सेवा प्रभावित झाल्यास त्याचा थेट परिणाम जनतेवर होतो. यात सार्वजनिक परिवहन बस सेवा, आरोग्य सेवा डॉक्टर, रुग्णालय या सेवांचा समावेश होतो.

### अत्यावश्यक सेवांचा दर्जा

एलपीजी वितरण, पेट्रोल पंप आणि तेल कंपन्यांच्या कामाला 'अत्यावश्यक सेवा' म्हणून घोषित करण्यात आले आहे. कामावर येण्यास नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर या कायद्यांतर्गत कठोर कारवाई किंवा अटक केली जाऊ शकते. युद्धामुळे कच्च्या तेलाची आवक कमी झाली असताना, देशांतर्गत उपलब्ध असलेल्या साठ्याचे वितरण समान पद्धतीने व्हावे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे.

# नाशिकमध्ये गरिबांच्या घरांवर बिल्डरांकडून डल्ला!

प्रतिनिधी १० मार्च

**नाशिक :** नाशिकमध्ये म्हाडा घरांच्या कोट्याबाबत मोठा घोटाळा उघडकीस आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. काही बांधकाम व्यावसायिकांनी बनावट कागदपत्रे, खोट्या सही-शिक्क्यांचा वापर करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात तब्बल ४९ प्रकरणांमध्ये सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

नियमांनुसार कोणत्याही बांधकाम व्यावसायिकाने ४ हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या क्षेत्रावर गृहप्रकल्प उभारताना त्या प्रकल्पातील २० टक्के घरांचा कोटा म्हाडासाठी राखीव ठेवणे बंधनकारक असते. या योजनेचा उद्देश आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात घर उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र नाशिकमधील काही बांधकाम व्यावसायिकांनी हा नियम टाळण्यासाठी गृहप्रकल्पाचे क्षेत्रफळ मुद्दाम कमी दाखवले, तसेच बनावट कागदपत्रे आणि खोट्या सही-शिक्क्यांच्या माध्यमातून शासनाची दिशाभूल केल्याचे तपासात समोर आले आहे. याशिवाय काही प्रकरणांमध्ये प्रकल्पातील पोटहिस्से २०१३ पूर्वीचे असल्याचा आभास निर्माण करून शासनाला देय असलेले २० टक्के फ्लॅट जमा करण्यात आले नसल्याचेही तपासात स्पष्ट झाले

# मुंबईतील 20 टक्के हॉटेल्स आजपासून बंद!

## युद्धाच्या झळा मुंबईपर्यंत पोहोचल्या; कमर्शिअल गॅसवर निर्बंध

प्रतिनिधी १० मार्च

**मुंबई :** इराण-इस्त्रायल संघर्षाचे पडसाद आता भारतातही उमटू लागले असून त्याचा थेट परिणाम एलपीजी पुरवठ्यावर होताना दिसत आहे. केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्रीसमोर मोठे संकट निर्माण झाले असून पुढील काही दिवसांत हा उद्योग ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गॅसच्या तुटवड्यामुळे मुंबईतील २०टक्के हॉटेल आजपासून बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पुढील तीन दिवस असाच गॅसचा तुटवडा सुरू राहिल्यास मुंबईतील




५०टक्के हॉटेल्स बंद होण्याची शक्यता आहे, माहिती आहार (असोसिएशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट) संघटनेकडून देण्यात आली आहे.

गॅसवरती हॉटेलमध्ये जेवणारे, कामगार पण अवलंबून आहे, व्यवसाय करणाऱ्यांना मोठं नुकसान आहे. हजारो लोकं काम करतात, उद्योग व्यवसाय असो किंवा घरात काय परिस्थिती होईल सांगता येत नाही. महागाईचा परिणाम १०० टक्के लोकांना जाणवणार आहे.

पुढील ८-१० दिवसात मध्यमवर्गीयांना सहन करावे लागेल. सरकार सगळं व्यवस्थित चांगलं आहे असं दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. पॅनिक सिचुएशन होऊ नये म्हणून सरकार करत आहे. ग्राऊंड परिस्थिती सगळ्यांना माहिती आहे काय आहे. सभागृहात सरकारनं आश्वासित करावं गॅसचा तुटवडा होणार आहे, सभागृहात आम्ही हा प्रश्न मांडणार आहोत. सरकार माहिती घेत आहे, पुरवठा किती आहे काय आहे? जर तुडवडा नसेल तर अधिकाऱ्यांकडून माहिती का घेतली जात आहे, असंही सतेज पाटलांनी म्हटलं आहे.

### आता घरगुती गॅसचाही नंबर लागण्याची शक्यता!

कमर्शिअल गॅसवर निर्बंध आणलेत. घरगुती गॅसचा देखील नंबर लागण्याची शक्यता आहे. चूल पेटवावी लागते का? असा प्रश्न आहे. ऑइल कंपन्यांकडे कच्चा माल नाही तर उत्पादन कसे वाढवणार, एकूणच परराष्ट्र धोरण चुकीच्या पद्धतीचे परिणाम आहेत, असेही काँग्रेस नेते आणि आमदार सतेज पाटील यांनी याबाबत बोलताना म्हटले आहे.

### आज आणि उद्या पुरेल एवढाच गॅसचा पुरवठा

पुढील तीन दिवस असाच गॅसचा तुटवडा सुरू राहिल्यास मुंबईतील ५० टक्के हॉटेल बंद करण्याची वेळ आहार संघटनेवर येईल, असे संघटनेच्या अध्यक्षांकडून सांगण्यात आले आहे. मुंबईतील विविध ठिकाणी हॉटेल्समध्ये गॅस पुरवठा कमी असल्याने आज आणि उद्या पुरेल एवढाच गॅसचा पुरवठा आहे. त्यामुळे त्या हॉटेल बंद ठेवावे लागतील, असे असोसिएशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंटकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278

जिंदगी बेहतर करने का सुनहरा अवसर

WORK FROM HOME

संधी सर्वांसाठी, घर से काम करें सभी के लिए बराबर अवसर?

Work Part Time/Full time

कौन कर सकता है?

स्टुडन्ट/ गृहिणी/ व्यापारी/ नौकरी/ बेरोजगार/ व्यवसायी/ रिटायर्ड/ कर्मचारी जॉब करते हुए

-:संपर्क:-

9765357896

# पाकिस्तानमध्ये हाहाःकार; शाळा बंद!

वृत्तसंस्था १० मार्च

**इस्लामाबाद :** अमेरिका-इराण युद्धामुळे पाकिस्तानमध्ये मोठा हाहाकार बघायला मिळतोय. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी देशाच्या तेलाचे संवर्धन करण्यासाठी अनेक कठोर उपाययोजनांची घोषणा केली. हेच नाही तर पाकिस्तानमध्ये तेलाचा इतका जास्त तुटवडा आहे की, त्यांनी धक्कादायक निर्णय घेत शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली. पाकिस्तानमध्ये अजिबात तेल शिल्लक नाहीये. यासोबतच कर्मचाऱ्यांचे पगार २५ टक्के कापले जाणार आहेत. सरकारकडून पेट्रोलच्या किंमती जवळपास २० टक्क्यांनी वाढवल्या. पाकिस्तानच्या सरकारने आता शाळा दोन आठवड्यांसाठी बंद ठेवण्याचा मोठा निर्णय घेतला.

इराण आणि अमेरिका यांच्या युद्धाचा फटका थेट इतर देशांना बसत आहे. हे युद्ध अजून काही दिवस चालेल. मात्र, जगातील अनेक देश संकटात आली आहेत. जगातील अनेक देशांवर तेलाचे आणि गॅसचे संकट आहे. तेलाची मोठी टंचाई निर्माण झाली. आखाती देशांमधून मोठ्या संख्येने जगात तेल पुरवठा होतो. मात्र, इराण अमेरिका युद्धाचा थेट परिणाम तेल निर्यातीवर झाला असून जवळपास तेलाची निर्यात बंद आहे. इराणने आखाती देशामधील तेल रिफायनरीवर हल्ला केला. इराणच्या तेल डेपोंना मोठी आग लागली. परिणामी तेलाची रिफायनरीच बंद झाली. जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती अस्थिर झाल्या आहेत. तेलाच्या किमती कधी उतरणार हे अमेरिका सांगूच शकत नसल्याचे इराणने म्हटले.

# बोर्डाच्या पेपरमध्ये कॉपीसाठी 'एआय'चा वापर!

## 81 शिक्षकांचे निलंबन, सामूहिक कॉपीचा हायटेक प्रकार

प्रतिनिधी १० मार्च

**बीड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेत तंत्रज्ञानाचा गैरवापर करून हायटेक पद्धतीने कॉपी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही कॉपी करण्यास मदत केल्याच्या आरोपाखाली राज्यभरातील ८१ शिक्षकांवर निलंबनाची ऐतिहासिक कारवाई करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात पहिल्यांदाच आर्टिफ़िशियल



इंटेलिजन्सचा (एआय) अशाप्रकारे गैरवापर समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

बोर्डाच्या भरारी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील चौसाळा परीक्षा केंद्रावर संशयास्पद हालचाली दिसून आल्या होत्या. यानंतर केलेल्या तपासादरम्यान असे आढळले की, परीक्षा सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच प्रश्नपत्रिकेचे फोटो व्हॉट्स अॅपद्वारे बाहेर पाठवले जात होते. हे प्रश्न 'चॅट जीपीटी' सारख्या 'एआय' टूल्सवर टाकून त्यांची अचूक उत्तरे मिळवली जात होती. ही उत्तरे चिठ्ठ्यांच्या स्वरूपात किंवा डिजिटल माध्यमांतून थेट वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जात असल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणात सर्वाधिक कारवाई बीड जिल्ह्यात झाली आहे. चौसाळा केंद्रातील गैरव्यवहार इतका गंभीर होता की तेथील अनेक शिक्षकांच्या संगनमताने हे रॅकेट सुरु असल्याचे समोर आले. याशिवाय जालना, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागातील काही केंद्रांवरही अशाच प्रकारचे संशयास्पद प्रकार बोर्डाच्या निदर्शनास आले आहेत.

### ...तर ८१ शिक्षकांची सेवा कायमस्वरूपी खंडित होईल?

तपासात काही धक्कादायक बाबीही समोर आल्या आहेत. शिक्षक आणि काही स्थानिक शिक्षण संस्थांचे कर्मचारी मिळून हे रॅकेट चालवत होते. यावेळी जप्त केलेल्या मोबाईल फोन्समध्ये प्रश्नपत्रिकांचे फोटो आणि एआयद्वारे जनरेट केलेली उत्तरे पुराव्यासाठी सापडली आहेत. याप्रकरणी ८१ शिक्षकांचे निलंबन करण्यात आले. या निलंबित ८१ शिक्षकांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. ते दोषी आढळल्यास त्यांची सेवा कायमस्वरूपी खंडित करण्याची तरतूद बोर्डाने विचारात घेतली आहे.

### परीक्षा केंद्रांवर जॅमर बसविणार!

तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणासाठी व्हावा, फसवणुकीसाठी नाही. या प्रकारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी आम्ही भरारी पथकांच्या संख्येत वाढ केली आहे. तसेच या घटनेमुळे भविष्यात परीक्षा केंद्रांवर जॅमर बसवण्याचा विचार करत आहोत, अशी माहिती महाराष्ट्र बोर्डाचे अध्यक्षांनी दिली.

## विमान कंपनीला वाचवल्याचा खा. राऊतांचा आरोप

प्रतिनिधी १० मार्च

**मुंबई :** एका विमान अपघाताच्या चौकशी प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या घटनेला २५-२६ दिवस उलटूनही सीबीआय चौकशीसाठी विलंब होत आहे, तर सुशांत सिंग राजपूत प्रकरणात दुसऱ्याच दिवशी चौकशी सुरू झाली होती. या प्रकरणात विमान कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि रोहित पवार यांनी वारंवार केलेल्या दाव्यांमध्ये तथ्य असल्याचे दिसत आहे, असा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. १० मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## विश्वमांगल्य छात्र सभा द्वारा शक्ती संवाद २०२६ संपन्न

**अमरावती:** विश्वमांगल्य छात्र सभा द्वारा शक्ती संवाद २०२६ - भारतीय अभिव्यक्ती की खोज या एक दिवसीय परिषदेचे आयोजन श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विमलाबाई देशमुख सभागृहात दिनांक २७ फेब्रुवारी ला संपन्न झाले. संपूर्ण विदर्भातील विविध महाविद्यालयांमधून एकूण ३२० विद्यार्थिनींचा सहभाग परिषदेकरिता होता. या परिषदेच्या उद्घाटन सत्राला विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संरक्षक तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य माननीय हेमंत काळमेघ, २०१९ च्या मिसेस इंडिया युनिव्हर्स मा. रूपलजी मोहता, विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांत संरक्षक मा.अंजली देव, विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संयोजिका मा.श्रुती देशपांडे, विश्वमांगल्य छात्र सभा विदर्भ प्रांत अध्यक्ष मा.स्मिता देशमुख या मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तथा प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

# आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी चिखलदऱ्यात बच्चू कडूंचा एल्गार

## ◆ सरकारच्या हस्तक्षेपानंतर मेळघाट संघर्ष महापदयात्रा स्थगित; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा बच्चू कडूंना फोन

प्रतिनिधी १० मार्च



**चिखलदरा :** मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या मूलभूत प्रश्नांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी काढलेल्या शेतकरी कर्जमाफी आठवण व मेळघाट संघर्ष महापदयात्रेची सांगता झाली. आंदोलनाची दखल घेत राज्याचे मंत्री उदय सामंत, मंत्री प्रकाश आबीटकर तसेच माजी खासदार आनंदराव अडसूळ हे चिखलदरा येथे आले आणि त्यांनी बच्चू कडू यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. या चर्चेनंतर सरकारकडून सकारात्मक भूमिका घेतली जाईल, असे आश्वासन देण्यात आल्याने मेळघाट संघर्ष महापदयात्रा सध्या स्थगित करण्यात आली.

१ मार्चपासून सुरू झालेल्या या महापदयात्रेतून मेळघाटातील पाणीटंचाई, आरोग्य सुविधा, रस्ते, वीज, वनहक्क, रोजगार आणि शेतकरी कर्जमाफीसारख्या अनेक ज्वलंत प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

चिखलदरा येथे झालेल्या सांगता सभेला मेळघाटातील विविध गावांमधून हजारो आदिवासी बांधव उपस्थित होते. अनेकांनी हातात फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली.

सभेत बोलताना बच्चू कडूंनी सांगितले की मेळघाटातील आदिवासी समाज आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, रस्ते, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या प्रश्नांवर शासनाने ठोस निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. यावेळी बोलताना मंत्री उदय सामंत यांनी पाणीपुरवठा, रोजगार हमी, उद्योग विभाग आणि परिवहनाशी संबंधित प्रश्नांवर अधिवेशन संपण्यापूर्वी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

आम्हाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः सांगितले की कुठल्याही परिस्थितीत बच्चू भाऊंच्या नेतृत्वात निघालेल्या पदयात्रेत सहभागी व्हा. मेळघाटातील आदिवासी नागरिकांना न्याय देण्यासाठी सरकार सदैव तुमच्या सोबत आहे. इथल्या युवकांच्या हाताला रोजगार मिळावा यासाठीही प्रयत्न केले जातील, असे सामंत यांनी सांगितले.

सभेत बोलताना मंत्री प्रकाश आबीटकर यांनी बच्चू कडूंच्या संघर्षमय नेतृत्वाचे कौतुक केले. ङमी २०१४ पासून बच्चू कडूंसोबत आमदार म्हणून काम करत आहे. संघर्षातून उभ्या राहिलेल्या नेत्याच्या मागे मोठा जनसमुदाय असतो आणि तो जनसमुदाय बच्चू भाऊंनी कमावला आहे. म्हणून आम्ही त्यांचे फॅन आहोत.

पुढील आठवड्यात बैठक घेऊन चुर्णी येथे उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्याबाबत निर्णय घेऊ, आरोग्य सेवा देणाऱ्या भगिनींसाठी निवास व स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यासाठी आराखडा तयार करू, तसेच कामचुकार कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आज दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी झाली त्याबद्दल आम्ही आभार मानतो. मात्र नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देऊन चालणार नाही. त्यांना किमान दीड लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळाला पाहिजे,ङ अशी मागणी बच्चू कडू यांनी केली. मेळघाट वासियांचा विश्वास तुटू देणार नाही अशी ग्वाही दिली.

दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडूंना दूरध्वनी करून आंदोलनाची दखल घेतल्याचे सांगितले.

'तुमच्या शेतकरी आंदोलनानंतर सरकारने समिती नेमली आणि ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. मेळघाट संघर्ष यात्रेत मांडलेले प्रश्नही लवकर सोडवले जातील. तसेच स्काय वॉकचे कामही लवकर पूर्णत्वास नेले जाईल,' अशी प्रतिक्रिया शिंदे यांनी दिली.

## प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करा - विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

प्रतिनिधी १० मार्च

### ◆ विभागीय लोकशाही दिनात तेरा प्रकरणांवर सुनावणी



**अमरावती:** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करणे तसेच संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे आवश्यक आहे. यानुसार प्रत्येक विभागाने त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करुन प्रकरण नस्तीबध्द करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण तेरा प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज आज पार पडले. यावेळी उपायुक्त रविंद्र हजारे, उपायुक्त संतोष कवडे, उपायुक्त राजू फडके यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी प्रत्यक्षरित्या तर पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते. यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण तेरा प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना केल्या. विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे एकूण १३ प्रकरणांवर लोकशाही दिनात चर्चा करण्यात आली. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाली नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली. यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा.

## कर्मयोगी संत गाडगे महाराजांच्या जन्मगावी भव्य स्मारकाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १० मार्च



**शेंडगाव :** कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या जन्मगावी शेंडगाव येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य स्मारकाच्या भूमीपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर, संत-महंत आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूमीपूजन सोहळा श्री संजय महाराज पाचपोर, पद्मश्री जनार्दन महाराज बोथे, वासुदेव महाराज महल्ले आणि अविनाश वानखेडे महाराज मोर्शी यांच्या उपस्थितीत पार पडला. तसेच आमदार गजानन लवटे, आमदार हरिभाऊ पिंपळे, आमदार प्रवीण तायडे, माजी मंत्री जगदीश गृप्ता आणि माजी आमदार रमेश बुंदेले यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून स्मारक उभारणीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला मुंबई विदर्भ वैभव मंदिर संस्थेचे अध्यक्ष अशोक बारब्दे, सरचिटणीस गजानन नागे, विदर्भ समाज संघ मुंबई चे अध्यक्ष श्पुरुषोत्तम भुयार, संजय बारब्दे, विजय खोत, प्रमोद तळोकार, संजय जायभाये, राजन जिचकार आणि अविनाश गावंडे यांसह विदर्भ वैभव मंदिर व विदर्भ समाज संघ मुंबईचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शेंडगाव परिसरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. भक्त आणि ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. मान्यवरांच्या उपस्थितीत विधीपूर्वक भूमीपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन श्रीधर नाईक आणि गाडगे महाराज जन्मभुमी स्मारक धर्मादाय संस्था यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. नगरसेवक प्रदीप मलीये यांच्यावतीने विटा स्मारकासाठी दहा लक्ष रुपयाचा निधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मेळघाटातील मनरेगाची स्थिती बिकट; कामांची उपलब्धता अन् स्थलांतराचा फटका

प्रतिनिधी १० मार्च



**धारणी:** मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा या दुर्गम आदिवासी तालुक्यांत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही रोजगाराची मुख्य सरकारी आधार रेषा मानली जाते. या दोन्ही तालुक्यात ८९,४३५ कुटुंब जॉबकार्डधारक आहेत. सरासरी कुटुंबातील कामकाजाच्या वयोगटातील सदस्यांचा विचार करता सुमारे १.५५ ते १.७० लाख मजूर पात्र ठरतात. कागदोपत्री दिसणारी ही भरारी प्रत्यक्षात कामावर ३३ ते ४५ हजार इतकीच राहत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. चार महिन्यांपासून प्रलंबित असलेली मजुरीअलीकडेच कामगारांच्या खात्यात जमा झाली. थकबाकीची २८.३९ कोटी रुपयांची रक्कम मिळाल्याने मेळघाटात कामगारांचा ओघ पुन्हा वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असली तरी गेल्या काही वर्षांतील परिस्थिती पाहता, शक्यता कमी असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. मनरेगां तर्गत पाणी संवर्धन, शेततळी, मुरूम रस्ते, वृक्षारोपण अशा कामांची मंजुरी असली, तरी प्रत्येक गावात एकाच वेळी मोठ्या संख्येने मजुरांना काम उपलब्ध होत नाही. कामांची आखणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील दरी अधिक आहे. यातच मजुरीही थकीत राहत असल्याने जगण्याचा प्रश्न निर्माण होतो. परिणामी हंगामी शेतमजुरी, बांधकाम किंवा इतर

मजुरीच्या संधी उपलब्ध झाल्यास अनेक मजूर तिकडे वळतात. काही कुटुंब तात्पुरत्या स्थलांतराचा पर्याय स्वीकारून अन्य शहरांमध्ये रोजगाराच्या शोधात जाणे पसंत करतात. परिणामी, जॉबकार्डवरील नावे कायम असली तरी प्रत्यक्ष हजेरी कमी दिसून येत आहे.

प्रशासकीय गती हासुद्धा मजुरांच्या प्रत्यक्ष कामावरील संख्येवर विपरीत रोजगारातील अनिश्चितता आणि उत्पन्नातील खंडामुळे मेळघाटात हंगामी स्थलांतराला चालना मिळत असल्याचे दिसून येते. अनेक कुटुंब काही

महिन्यांसाठी गाव सोडतात. मुलांचे शिक्षण खंडित होते, महिलांवर दुहेरी जबाबदारी येते, तर वृद्धांची देखभाल प्रश्नांकित होते. गावांतील श्रमशक्ती कमी पडल्याने स्थानिक अर्थचक्रावरही परिणाम होतो. मेळघाटात स्थलांतर ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आव्हानाचीही साखळी ठरली आहे. ग्रामपंचायतींच्या पातळीवर कामांची मंजुरी, मस्टर नोंदी, मोजमाप आणि देयके यामध्ये होणारा विलंब मजुरांचा विश्वास ढळवतो. सतत काम मिळेल आणि वेळेत मजुरी मिळेल, याची खात्री नसल्यास मजूर पर्याय शोधतात. परिणामी, नोंदणीची संख्या वाढत असली तरी प्रत्यक्ष श्रमशक्ती घटत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा - १

प्रतिनिधी १० मार्च

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा – १ अंतर्गत राजस्व मंडळाच्या वतीने सिकची रिसोर्ट, वलगांव (ता. अमरावती) येथे भव्य राजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांच्या महसुली समस्यांचे तात्काळ निराकरण करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन आमदार रवि राणा व आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले.

### ◆ पालकमंत्र्यांची उपस्थिती

या कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सुनिल वऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना आमदार रवि राणा यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील गावा-गावातील प्रत्येक शेतकरी, शेतमजूर, ज्येष्ठ नागरिक, महिला-पुरुष तसेच विद्यार्थ्यांपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचविण्याचे कार्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रभावीपणे सुरू आहे. संतांच्या विचारांवर चालत तळागाळातील जनतेला न्याय मिळवुन देण्याकरीता कटिबद्ध असलेले हे सरकार सर्वसामान्यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाला महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा आणि त्यांच्या प्रलंबित समस्यांचे त्वरित निराकरण व्हावे यासाठी राज्याचे महसुल मंत्री व अमरावती जिल्हयाचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सातत्याने प्रयत्न करत असल्याचे आमदार राणा यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.



## रामनवमी, ईद सणानिमित्त स्वस्त धान्याचा पुरवठा व्यवस्थित करावा

प्रतिनिधी १० मार्च

### ◆ राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे निवेदन



**खामगांव :** रामनवमी व रमजान ईद या दोन्ही पवित्र सणानिमित्त स्वस्त धान्य दुकानात अन्नाचा तुटवडा असून या काळात स्वस्त धान्याचा पुरवठा व्यवस्थित करावा अशा मागणीचे निवेदन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना पाठविले आहे. सदर निवेदनात नमूद आहे की, हिंदु व मुस्लीम बांधवांचे पवित्र सण रामनवमी व रमजान ईद मार्च महिन्यात येत आहेत. त्या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकानात अद्याप पावेतो पुरेसा धान्याचा पुरवठा शिधा पत्रिका धारकांना झालेला नाही. ७ मार्च २०२६ पावेतो मार्च महिन्याचे कोणत्याही प्रकारचे शिधा वाटपाचे वितरण सुरु झालेले नाही. तरी त्वरीत धान्य पुरवठा करण्यात यावा जेणेकरून नागरिकांना त्रास होणार नाही व त्यांचे सण आनंदाने साजरे होतील.

सरकारकडून मिळणारी धान्याची मदत ही गोरगरीबांना आपल्या संसारासाठी फार महत्वाची आहे. पूर्वी निवडणूक काळात गोरगरीबांना शिधा वाटप किटचे वाटप करण्यात आले होते. परंतू आता कोणत्याही प्रकारचे किट वाटप होत नाही त्यामुळे ठगरज सरो वैद्य मरोठ या उक्तीचा प्रत्यय शिधापत्रिका धारकांना येत आहे.

म्हणून त्वरीत आदेश काढून नागरिकांना तातडीने धान्याचा पुरवठा करावा असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## खामगावात सामूहिक व्रतबंधन सोहळा उत्साहात; महाराष्ट्र ब्राह्मण सभेच्या वतीने भव्य आयोजन

प्रतिनिधी १० मार्च




**खामगाव:** येथे महाराष्ट्र ब्राह्मण सभेच्या वतीने खामगाव येथे सामूहिक उपनयन संस्कार (व्रतबंधन) सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर तसेच परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले, माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांच्यासह नगराध्यक्ष अपर्णाताई फुंडकर यांनी उपस्थिती लावली.

या प्रसंगी मान्यवरांनी उपनयन संस्कारासाठी उपस्थित असलेल्या बटूंना आशीर्वाद देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. भारतीय संस्कृतीतील उपनयन हा एक महत्त्वाचा धार्मिक संस्कार असून या माध्यमातून मुलांना संस्कार, शिस्त व ज्ञानाचे महत्त्व समजते, असेही यावेळी मान्यवरांनी सांगितले.

महाराष्ट्र ब्राह्मण सभेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सामूहिक उपनयन संस्कार सोहळ्याला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## बाळासाहेब ठाकरे स्मृती ग्रामपंचायत भवन बांधकामात प्रशासनाची दिशाभूल

प्रतिनिधी १० मार्च

### गावठाणची जागा हडपण्याचा डाव, धानोरा गुरव येथील प्रकार

**अमरावती :** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धानोरा गुरव येथे उभारण्यात येत असलेल्या 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत भवन' बांधकामाला काही असामाजिक तत्वांनी चुकीची माहिती देऊन जाणीवपूर्वक अडथळा आणल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे निवेदन सादर करून न्याय देण्याची मागणी केली आहे. धानोरा गुरव येथे जवळपास ३० वर्षांपासून ग्रामपंचायतीची स्वतःची इमारत नसल्यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज समाजमंदिरातून चालविले जात होते. त्यामुळे गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत भवन उभारण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली होती. शासनाने या मागणीची दखल घेत 'मातोश्री ग्रामपंचायत भवन' योजनेअंतर्गत धानोरा गुरव येथील ग्रामपंचायत भवन मंजूर केले. यानंतर ग्रामपंचायतीने सर्व प्रशासकीय मान्यता घेऊन गावठाण क्षेत्रातील पी.आर. कार्डनुसार ग्रामपंचायतीच्या मालकीची ६००० चौ.फुट जागा भवन बांधकामासाठी निश्चित केली. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून शासकीय कंत्राटदार राहुल राठी यांना १९ जानेवारी २०२६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आणि त्यानुसार कामालाही सुरुवात करण्यात आली.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. १० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सामाजिक न्याय विभागातर्फे पुरस्कारासाठी अर्ज मागविले

**अकोला:** सामाजिक क्षेत्रात चांगले कार्य करणा-यांना सामाजिक न्याय विभागातर्फे विविध पुरस्कार दिले जातात. त्यासाठी इच्छूकांनी दि. १५ मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन सहायक आयुक्त एम. जी. वाठ यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार, शाहू फुले आंबेडकर पुरस्कार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या ७ पुरस्कारांसाठी, तसेच २०२४-२५ व २५-२६ या कालावधीसाठी अर्ज मागविले आहेत. इच्छूकांनी अर्ज चार प्रतीत पोलीसांच्या चारित्र्य पडताळणी दाखल्यासह सहायक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, अकोला येथे पाठवावा.

## लहान मुलींनी पूर्ण केला पहिला रोजा



**हिवरखेड :** रमजान महिन्यात मुस्लिम धर्मीय रोजा पाळतात. लहान मुले सुद्धा पहिला उपवास ठेवतात. रमजान महिन्यात रोजा ठेवून अल्लाहची इबादत करणे, नमाज अदा करणे, कुरआन पठण करणे तसेच गरजूंची मदत करणे याला विशेष महत्त्व आहे. सोमवारला १९ वा रोजा आयज़ा उरूज जमीर शेख ( ८ वर्षे ) व जुमरा शाफीन तौफीक अली( ९ वर्षे) या दोनही चिमुकलींनी तब्बल १३ तास ३३ मिनिटे अन्न-पाणी न घेता आपला पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले.

## प्रेरणा फिटनेस पार्क येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**अकोला:** प्रेरणा फिटनेस पार्क येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात परिसरातील अनेक महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. महिलांच्या आरोग्य, फिटनेस आणि सक्षमीकरणाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपस्थित महिलांनी व्यायाम, योगा आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा आनंद घेतला. रेणुका अलमेलकर, क्रान्ती तेलगोटे, हिरल ठक्कर, वंदना रानीवाल, माधुरी मेरेकर, शारदा सटाले, सोनल देशपांडे, मीना लोहिया, वंदना ठाकुर, रुपाली सावजी, स्वाती सूर्यवंशी, मृणाल माटवडेकर, सुषमा पोलाखाडे, गायत्री वाघमारे यांच्या उपस्थितीत पार पडला. संचालिका संगीता राजेश मुळे यांचा पुढाकार होता.

# तापमान वाढताच खारपणपट्टा तहानला; तालुक्यात पाणी टंचाईच्या झळा

प्रतिनिधी १० मार्च

**◆ जीवन प्राधिकरणाचे दुर्लक्ष होत असल्याचा नागरिकांचा आरोप**

**अकोट:** अकोट अकोट तालुक्यातील ८४ खेळी पाणीपुरवठा योजना अंतर्गत येणाऱ्या खारपाणपट्ट्यात पाणीटंचाईच्या झळा बसायला सुरुवात झाली आहे अजून मार्च महिन्याची सुरुवात असून थोडे तापमान वाढताच नागरिकांना पिण्याच्या पानासाठी वन वन भटकावे लागत आहे. हा भाग खारपान पट्टा मार्फत असल्यामुळे येथे विहिरी आणि हापसीला गोडे पाणी लागत नाही तसेच हे पाणी अंघोळ आणि कपड्यांसाठी देखील वापरण्याजोगे नाही तालुक्यातील काही गावांमध्ये तर आतापासूनच भीषण पाणीटंचाई चा सामना करावा लागत आहे. या



मध्ये प्रामुख्याने वरुड जवळका, लोतखेळ, खापरवाडी व बांबर्डा येथे गेल्या दहा ते बारा दिवसापासून पाण्याची खूप मोठी भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ८४ खेळी पाणीपुरवठा अधिकारी यांना त्रासाला कंटाळले आहेत, त्यादिवशी नळ येतात मात्र प्रेशर आणि बायपासने पाणीपुरवठा होत असल्यामुळे काही लोक तुपाशी तर काही लोक उपाशीच अशी दयनीय परिस्थिती निर्माण झाली आहे.

"पाण्यासाठी जीवघेणी कसरत पाणीपुरवठा बंद असल्याने आम्हाला तलाव आणि हापसी यावर अवलंबून राहावे लागत आहे विकतचे पाणी घेण्याची वेळ आमच्यावर आली आहे आम्हाला पाणी न दिल्यास आम्ही संपूर्ण कुटुंब प्रधिकरणाच्या ऑफिसमध्ये घेऊन बसू,

**कविता सूर्यवंशी** महिला बांबर्डा बु.

"पाणीपुरवठा हा आमच्याकडून व्यवस्थित सुरू आहे त्या ग्रामपंचायतीचे नियोजन नाही.

**निखिल राऊत**
शाखा अभियंता
मजिप्रा, अकोट

# अडगांव बु. येथे हरभऱ्याच्या गंजीला आग



प्रतिनिधी १० मार्च

**अडगांव:** येथील अल्पभूधारक शेतकरी शशिकांत वैजीनाथ तंबारे यांच्या तीन एकर शेतातील सोंगलेल्या हरबऱ्याच्या गंजीला आग लागल्याची घटना ८ मार्च च्या रात्री घडली. शेतकरी तंबारे यांनी तीन एकरात यंदा मोठ्या आशेने हरभऱ्याची लागवड केली होती. दिवस रात्र कष्ट करून पीक काढणीला आले. कापणी करून मळणीसाठी शेतात गंजी रचून ठेवली होती. मळणी होऊन हाती पैसा यायच्या आत काळाने घाला घातल्याने आगीत जमा करुन ठेवलेला हरभरा खाक झाला. याप्रकरणी शेतकरी शशिकांत तंबारे कडुन हिवरखेड पोलीस पोलीस स्टेशनला ३० पोते होत असलेला १,७५,००० हजाराचा हरबरा जळुन नुकसान झाल्याची तक्रार देण्यात आली. त्यानुसार पोलीसांनी अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करुण पुढील तपास सुरू केला आहे.

# सेंट पॉल्स अकॅडमी येथे महिला दिन साजरा

वि. प्रतिनिधी १० मार्च

**अकोट:** श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे महिला दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया यांनी पद भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष लुणकरन डागा सचिव प्रमोद चांडक , रेखा चांडक, शारदा लखोटीया यांची उपस्थिती लाभली तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे यांची मंचावर उपस्थित



लाभली. कार्यशाळेचे मार्गदर्शक म्हणून अभिजीत चतारे झोन ट्रेनर जे. सी. आय. यांनी आपली भूमिका निभावली. कार्यशाळेचा मुख्य उद्देश महिलांचे वैचारिक सक्षमीकरण हा होता. यात प्रत्यक्ष महिलांचा सहभाग घेऊन त्यांच्या विविध समस्या सोडविण्याच्या पद्धतीवर मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्न करावे लागते तरच त्यात यशस्वी होता येईल असे मार्गदर्शन केले तर महिला दिनानिमित्त रेखा चांडक, ममता श्रावगी व रिंकू अग्रवाल यांनी अपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन वैभव हिंगणकर व आभार प्रदर्शन आनंद काळमेघ यांनी केले.

# कस्तुरीतर्फे १३ सफाई कामगार महिलांचा हृद्य सत्कार

प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** कस्तुरी सेवाभावी संस्थे सोबत समाजातील इतरही संस्था जुळत असून त्या निमित्ताने समाजसेवेचा महासंघ उभारल्या जात आहे, असे प्रतिपादन कस्तुरीच्या जेष्ठ सदस्य श्रीमती शिलाताई गहलोत यांनी केले.

कस्तुरीच्या वतीने अकोला महानगरपालिका क्षेत्रातील ४ झोन मधील स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या १३ निवडक स्वच्छतादूत महिलांचा शाल , गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर माजी आमदार वसंतराव खोटरे, आरोग्य निरीक्षक



सुनील कंडेरा , महानगर सचिव अमोल डोईफोडे , डॉ. माधुरी सोनी , जयाताई खेडकर व कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले उपस्थित होते. प्रा. किशोर बुटोले यांनी प्रास्ताविकात कस्तुरीच्या मागील १५ वर्षांत झालेल्या सेवाकार्यावर प्रकाश टाकला. केवळ समाजातील वंचित व उपेक्षित घटकांच्या उत्थानासाठीच श्री संत गजानन महाराजांच्या कृपेने स्थापन झालेल्या कस्तुरीकडून अखंड सेवाकार्य सुरू आहे असेही ते म्हणाले.

वसंतराव खोटरे, डॉ. माधुरी सोनी यांनी सेवाकार्याचे कौतुक केले. श्रीमती जयाताई खेडकर यांनी कस्तुरी परिसराला माहेर संबोधले. कस्तुरीच्या जेष्ठ सदस्य सौ. मीरा देशपांडे , कोषाध्यक्ष चेतना आनंदानी, अपर्णा काळे यांचा सुद्धा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. नरेंद्र देवघरे यांनी कस्तुरीची सदस्यता स्वीकारल्याबद्दल आणि सचिन मोडक यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अपर्णा काळे , राजेश्वर पेठकर यांनी तर आभारप्रदर्शन चेतना आनंदानी यांनी केले.

# कर्जमाफी नको, शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्ती हवी

प्रतिनिधी १० मार्च

**अकोट:** राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीवर शेतकरी पुन्हा एकदा नाराजी व्यक्त करत असून



कर्जमाफी नको, आम्हाला कायमस्वरूपी कर्जमुक्ती हवी अशी ठाम भूमिका आकोलखेड सह तालुक्यातील शेतकरी घेताना दिसत आहेत.

कर्जमाफी योजने मध्ये कठोर निकष लावून अनेक शेतकरी वंचित राहतात, त्यामुळे या योजना फक्त कागदोपत्रीच राहतात असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्याचे म्हणणे आहे की, प्रत्येक काही वर्षांनी कर्जमाफीची घोषणा करून सरकार तात्पुरता दिलासा देते, पण शेतीचा वाढता खर्च, कमी बाजार भाव आणि अनियमित हवामान मुळे शेतकरी पुन्हा कर्जाच्या जाळ्यात अडकतो.

**◆ शेतकऱ्यांचा सरकारला इशारा**

कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडत असून आत्महत्याचे प्रमाणही चिंताजनक आहे. त्यामुळे आता केवळ कर्जमाफी नव्हे , शतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी कर्जमुक्ती व्यापक योजना राबवावी अशी जोरदार मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

**कंचन मुकुंद जांभळे**
शेतकरी संघटना , कार्यकर्ता अकोट

सरकारने दरवेळी कर्जमाफी घोषणा करून शेतकऱ्याची दिशाभूल करू नये ,आम्हाला तात्पुरती कर्जमाफी नको ,तर कायमची कर्ज मुक्ती हवी. शेतीचा प्रचंड खर्च वाढला आहे. सरकार ने फक्त घोषणा न करता शेतमालाला योग्य भाव ,सिंचन वेव्यास्था आणि उत्पादनाला योग्य बाजार मिळावून देऊन शेतकऱ्यांना कायमचे कर्जमुक्त करावे.

**सुदेश परमानंद लोखंडे,**
प्रगतशील शेतकरी अकोलखेड

## निधन वार्ता

**डॉ. आर. एन. भांबूरकर**



**अकोला :** शहरातील जुन्या पिढीतील निष्णात डॉक्टर आर. एन. भांबूरकर (९१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहिगाव येथील मूळ रहिवासी डॉ. भांबूरकर छाती विकार तज्ञ होते. या भागातील अनेक क्षय रूग्णांना त्यांनी बरे केले होते. आयएमए अकोलाचे ते सक्रिय सदस्य होते.

# मावळे जातीसाठी नाहीत, तर धर्माच्या अस्मितेसाठी लढले : प्रेरणाताई भोसले

प्रतिनिधी १० मार्च

**अडगांव बु. :** छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले ते कुण्या जातीपातीच्या भरोशावर नव्हे तर धर्माच्या नावावर प्रत्येक मावळा एकत्र करून जातीपातीसाठी नव्हे तर हिंदू धर्मासाठी लढले. आपल्याला छत्रपतींचा वारसा पुढे न्यायचा असेल, आणि भविष्यातील हिन्दू धर्मा समोरील आव्हाने लक्षात घेता जातीपातीच्या भिंती पाडुन केवळ हिन्दु धर्माच्या नावावर एकत्र येणे ही काळाची गरज आहे असे आवाहन शिवचरित्रकार व्याख्यात्या प्रेरणाताई भोसले यांनी सकल हिंदू समाजाच्या विराट हिंदू संमेलनात केले.



त्या यावेळी अडगांव बु येथील राम मंदिर चौकातील सकल हिन्दु समाजाच्या वतीने आयोजित विराट हिंदू संमेलनाला संबोधित करत होत्या.

अकोला विभाग अभिलेखागार संयोजक महेंद्रजी कविश्वर प्रमुख अतिथी होते. सर्वप्रथम गावातील प्रमुख मार्गावरून भारत मातेच्या प्रतिमेची वाजत गाजत कलश यात्रा काढण्यात आली. सम्मेलनस्थळी पोहचल्यावर हिंदू संमेलनाला सुरुवात झाली. प्रेरणाताई भोसले यांचे स्वागत दिपाताई सिसोदिया व तन्वी मांडवगडे यांनी शाल व श्रीफळ देऊन केले. तर महेंद्रजी कवीश्वर यांचे स्वागत पवण ढोकणे यांनी केले. गीत नरेंद्र मानकर यांनी गायीले. महेंद्रजी कवीशर यांचे ओजस्वी मार्गदर्शन पर भाषण संपन्न होऊन आरती झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार नाना देशमुख व आभार प्रदर्शन नरेंद्र मानकर यांनी केले.

# ऑल इंडिया पंजाब नॅशनल बँक ऑफिसर्स असोसिएशनच्या वतीने महिला दिन साजरा



प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला शहरातील पंजाब नॅशनल बँकेच्या शाखा टिळक रोड, शाखा महानगरपालिका तसेच शाखा नवीन कापड बाजार येथील कार्यरत महिला अधिकारी, कर्मचारी चारुशीला सोळंके, रेश्मा भडांगे, भावना वानखेडे, नेहा वरणकर, दिक्षा खांडेकर, श्वेता देशमुख, संगीता बाहेती, अंकिता सोळंके, तश्विनी वाघमारे, आदी यांना विविध भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

शाखा व्यवस्थापक दर्शन मोरे यांनी सांगितले की, हा दिवस केवळ शुभेच्छा देण्याचा नसून महिलांच्या समान हक्कांसाठी लढा चालू ठेवण्याची आठवण करून देणारा आहे.

महिला दिनाचा अर्थ फक्त एकदाच सन्मान करणे असा नाही. खरा महिला दिन तेव्हा साजरा होईल, जेव्हा समाजात तिला सन्मानाने जगता येईल, तिला शिक्षणाचा आणि सुरक्षिततेचा समान अधिकार मिळेल. असे प्रतिपादन वरिष्ठ व्यवस्थापक विमल बाजोरिया यांनी केले.

अमोल पवार शाखा व्यवस्थापक महानगरपालिका यांनी सांगितले महिला दिन महिलांच्या हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती करण्याची आठवण करून देणारा ठरला आहे.

प्रवीण राठोड, शाखा व्यवस्थापक यांनी शाखेतील अधिकारी, कर्मचारी महिलांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला.

ऑल इंडिया पंजाब नॅशनल बँक ऑफिसर्स असोसिएशनच्या वतीने संयुक्त सचिव प्रणित दाभाडे म्हणाले, महिला ही फक्त आज घरा पर्यंत मर्यादित नसून ती आज समाजाची दिशा ठरवणारी महत्वाची व्यक्ती ठरत आहे. याप्रसंगी ऋषिकेश देशमुख, सागर काळपांडे, वैभव दीपके, सागर तऱ्हाळकर, पवन सावरकर, आदी अधिकारी, कर्मचारी, ग्राहकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा उत्साह वाढवला.

# रोटरी क्लब ऑफ अकोटतर्फे विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

वि. प्रतिनिधी १० मार्च

**अकोट :** रोटरी क्लब आकोट तर्फे जागतिक महिला दिन निमित्त अकोट शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.



यामध्ये श्रीमती क्रांतीताई त्र्यंबकराव लोखंडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. इनरव्हील क्लबच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत कष्टकरी व गरजू महिलांच्या विकासासाठी महिला औद्योगिक सहकारी संस्थेची स्थापना केली आहे.

डॉ. पुष्पाताई साहेबराव वालशिंगे यांनी वैद्यकीय सेवेसोबतच मराठा महिला मंडळ व इनरव्हील क्लबच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य सातत्याने केले आहे. उषाताई गजानन ढोरे यांनी अकोट तसेच दर्यापूर ग्रामीण रुग्णालयात ३८ वर्षे सेवा बजावत असिस्टंट मेट्रन पदापर्यंत मजल मारली. सध्या त्या मराठा महिला मंडळाच्या अध्यक्ष असून योगासन वर्गासह विविध उपक्रमांद्वारे समाजसेवेत सक्रिय आहेत. डॉ. श्रेया निखिल लहाने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. या सर्व महिलांचा सन्मानचिन्ह व वृक्षांची रोपे देऊन क्लबचे अध्यक्ष रवी पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे सचिव डॉ. नावेश मोहता, राजकुमार गांधी, संतोष इस्तापे, शिरीष पोटे, दिपक कतोरे, उद्धव गणगणे, श्याम शर्मा आदी उपस्थित होते.

# इराणवरील हल्ल्याचा भाकपकडून तीव्र निषेध

प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** भारतीय कम्युनिस्ट पक्ष ऑल इंडिया युथ फेडरेशनने शांततेसाठी कामगार नेते नयन गायकवाड यांच्या नेतृत्वात व रमेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनात अमेरिका-इस्त्रायलने केलेल्या इराणवरील हल्ल्याचा तीव्र निषेध केला. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रपतींना निवेदन पाठवले.

एपस्टीन फाईल्स मधील सत्य दडविण्यासाठी, जगातील तेल व खनिज संपत्ती बळकाविण्यासाठी आणि जगावरील डॉलरचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी, डोनाल्ड ट्रम्प अमेरिका-इस्त्रायलने



बेकायदेशीरपणे युद्ध इराण वर लादले आहे असा आरोप केला. पंतप्रधान मोदी यांच्या सरकारने घेतलेल्या चुकीच्या परराष्ट्र धोरणात्मक दिशेमुळे गंभीर परिस्थितीला भारतीयांना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांचा अमेरिका-इस्त्रायलच्या फायद्यासाठी बळी जाता कामा नये. निवेदन देताना नयन गायकवाड, मायावती बोरकर, सविता प्रधान, प्रीती नायसे, माधुरी पवार, भारती बसेरे, पुनम, शालिनी, कंचन सरदार, सागर निंबाळकर, पूनम खोब्रागडे उपस्थित होते.

# गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिन

प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** गर्भधारणेदरम्यान काही महिलांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते, या स्थितीला गर्भधारणेतील मधुमेह असे म्हणतात. या आजाराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १० मार्च हा दिवस गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिन म्हणून पाळला जातो.

गर्भधारणेतील मधुमेह वेळेवर ओळखला नाही तर आई व बाळाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे गर्भवती महिलांनी नियमित तपासणी करणे, डॉक्टरांच्या सल्ल्याने आहार व व्यायाम पाळणे आणि आवश्यक असल्यास औषधोपचार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या आजारामुळे बाळाचे वजन जास्त होणे, प्रसूतीदरम्यान गुंतागुंत निर्माण होणे तसेच भविष्यात आईला मधुमेह होण्याची शक्यता वाढू शकते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १० मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# ईचोरी येथे तरुणाचा खून

## चोरीच्या संशयातून उफाळला वाद, आरोपीला अटक

प्रतिनिधी १० मार्च

**यवतमाळ :** कोंबडा चोरीच्या संशयातून झालेल्या वादातून २७ वर्षीय तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना ईचोरी येथे उघडकीस आली. या प्रकरणी लाडखेड पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

किशोर राजू कुंभेकर (वय २७) असे मृत तरुणाचे नाव असून किसन शामा घोटकर (वय ४३, रा. ईचोरी, ता. यवतमाळ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी किसन घोटकर यांच्या घरी कोंबड्या पाळल्या जातात. रविवारी सकाळच्या सुमारास घोटकर कुटुंबीयांना घराबाहेर संशयास्पद हालचाल ऐकू आली. बाहेर येऊन पाहिले असता किशोर कुंभेकर हा त्याच्या एका मित्रासोबत




तेथे उभा असल्याचे दिसले. कोंबडा चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा संशय आल्याने किसन घोटकर व किशोर कुंभेकर यांच्यात वाद झाला.

वाद वाढत जाऊन त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. यावेळी आरोपीने लाकडी काठीने मारहाण केल्याने किशोर कुंभेकर गंभीर जखमी झाला.

जखमी अवस्थेत तो घरी परतल्यानंतर दुपारच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच दारव्हा उपविभागीय पोलिस अधिकारी भोरे, पोलिस उपनिरीक्षक विनायक लांबे व पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

या प्रकरणी मृताचे वडील राजू कुंभेकर यांनी लाडखेड पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी रात्रीच आरोपीला ताब्यात घेतले. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक विनायक लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# सावित्रीबाई फुले स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

प्रतिनिधी १० मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील नगरपरिषदेत सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याला आणि विचारांना अभिवादन करण्यात आले. स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या आणि समाजातील अंधश्रद्धा व अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या महान समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून नागरिकांनी विनम्र अभिवादन केले. नगरपरिषदेच्या अध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करत समाजात शिक्षण, समानता आणि प्रगतीचा संदेश पसरवण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, "सावित्रीबाई फुले यांनी समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी केलेले कार्य आणि स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडण्याचा धाडसी निर्णय आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे." यावेळी महिला व नागरिकांनीही माल्यार्पण करून त्यांना अभिवादन केले. त्यांच्या विचारांचा आदर्श समाजात रुजवण्याचा निर्धार व्यक्त केला.





## उन्हामुळे दुपारी रस्ते सामसूम

प्रतिनिधी १० मार्च

**पुसद :** उन्हाचा पारा मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सतत वाढत चालला आहे. उन्हाच्या झळा सकाळपासून असह्य होत आहेत. यामुळे दुपारी १२ नंतर पुसद शहरातील रस्ते सामसूम होत आहेत. महत्त्वाचे काम असल्यावरच नागरिक घराबाहेर पडण्याची हिम्मत करताना दिसत आहेत.

# एकाच रॉयल्टीवर दहा ट्रिप!





प्रतिनिधी १० मार्च

**उमरखेड :** तालुक्यातील चुरमुरा फाट्याजवळ मुरूम, गिट्टी व रेती वाहतुकीसंदर्भात महसूल प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रॉयल्टी तपासणीच्या नावाखाली वाहन चालकांकडून पैसे उकळले जात असल्याचे आरोप समोर येत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, काही वाहन चालकांकडून चिरीमिरी घेतल्यावर त्यांची वाहने सोडली जात असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे मुरूम, गिट्टी आणि रेती वाहतूक करणाऱ्या गाड्या एकाच रॉयल्टीवर दहा-दहा वेळा ट्रिप करत असल्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, काल विठ्ठल येथील तलाठ्याने शहरातच रेतीचे दोन टिप्पर चिरीमिरी घेऊन सोडल्याची चर्चा खटयावर रंगली असून या प्रकरणाने अधिकच खळबळ उडाली आहे. या सर्व प्रकारामुळे अवैध रेती माफियांचे मनोबल वाढत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**चुरमुरा फाटा बनला वसुलीचा अड्डा**

प्रशासनाची भूमिका मात्र संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून संबंधितांवर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. उमरखेडचे तहसीलदार व उपजिल्हाधिकारी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन शासनाचा महसूल बुडवणाऱ्या अवैध माफियांवर कडक कारवाई करतील का, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणामुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्येही तीव्र संताप व्यक्त होत आहे. आता प्रशासन या प्रकरणात ठोस पावले उचलते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## चक्रवती नदीत आढळला मृतदेह

प्रतिनिधी १० मार्च

**कळंब :** शहरालगतच्या चक्रवती नदीत गायसागर पात्रामध्ये एका २४ वर्षीय युतकाचा मृतदेह आढळून आला. मृतकाचे नाव तोहीत अकील शेख (२४, रा. माथा वस्ती, कळंब) असे आहे. तोहीत शेख हा मागील तीन दिवसांपूर्वी नेहमीप्रमाणे घरातून कामावर जाण्यासाठी बाहेर पडला होता. मात्र त्यानंतर तो घरी परतला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. सर्वत्र शोध घेतल्यानंतरही त्याचा काहीच पत्ता लागला नाही. अखेर कुटुंबीयांनी कळंब पोलिस ठाण्यामध्ये तो बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. शनिवारी रात्री चक्रवती नदीत युतकाचा मृतदेह असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# शेतजमिनीच्या नुकसानावरुन उपोषण; आश्वासनानंतर तोडगा

प्रतिनिधी १० मार्च

**उमरखेड :** तालुक्यातील मुळावा येथील माजी जिल्हा परिषद सभापती शहांजी खडसे व त्यांचे बंधू भागोराव खडसे व सुदाम खडसे यांच्या शेतजमिनीत झालेल्या नुकसानीच्या प्रकरणी सुरू केलेले आमरण उपोषण अखेर आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, यांच्या मध्यस्थीमुळे या प्रकरणात तोडगा निघाला. मिळालेल्या माहितीनुसार, खडसे बंधूंच्या शेतजमिनीतून रेल्वे कामासाठी एका ठेकेदाराने करार करून मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन केले होते. करारानुसार मुरूम काढल्यानंतर तयार झालेल्या खड्ड्यांमध्ये माती टाकून शेतजमिनीचे समतलीकरण करून देण्याचे ठरले




होते. मात्र संबंधित ठेकेदाराने काम अर्धवट सोडून दिल्याने शेतजमिनीचे मोठे नुकसान झाले.

या प्रकरणी न्याय मिळावा या मागणीसाठी शहांजी खडसे यांनी ९ मार्च रोजी उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आपल्या दोन भावांसह आमरण उपोषण सुरू केले होते.

दरम्यान, भाजपाचे जिल्हा समन्वयक Nitin Bhutada यांनी उपोषणस्थळी भेट देऊन संबंधित अधिकारी तसेच कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. खडसे बंधूंच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे ठोस आश्वासन त्यांनी दिले. तसेच वयोमान लक्षात घेता उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून उपोषण मागे घेण्याची विनंती करण्यात आली. यानंतर भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी अर्थ व बांधकाम सभापती तथा काँग्रेस नेते तातूजी देशमुख व इतर मान्यवरांच्या हस्ते शरबत पिऊन शहांजी खडसे यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले.

यावेळी मुळावा येथील माजी पोलीस पाटील साहेबराव खडसे, गणेशराव खडसे, उपसरपंच देशमुख, विलास चव्हाण, सुभाष बरडे, नायब तहसीलदार राणे, वरिष्ठ लिपीक अक्षय बोनगुलवार तसेच गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# जिनिंग अँड प्रेसिंग संस्थेच्या १४ गाळ्यांच्या बांधकामावर स्थगनादेश

प्रतिनिधी १० मार्च

**उमरखेड :** उमरखेड येथील सहकार महर्षी स्व. भाऊसाहेब माने जिनिंग अँड प्रेसिंग संस्थेच्या १४ गाळ्यांच्या बांधकामावर वाद निर्माण झाला असून, जिल्हा उपनिबंधक कार्यालयातून सखोल चौकशीपर्यंत काम तात्पुरते थांबविण्याचे आदेश दिले गेले आहेत.

संस्थेच्या संचालक मंडळाच्या ३१ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत जीन क्र. २ मधील १४ गाळे बांधण्याचा प्रस्ताव चर्चेत आला होता. या कामासाठी तीन टेंडर आले होते, त्यात सर्वात कमी दराचे टेंडर सुमारे १ हजार ४२५ रुपये प्रति चौ.फूट होते. मात्र, टेंडर प्रक्रिया न उघडता अध्यक्षांच्या आदेशावर काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संस्थेतील मानद सचिव चिंतागराव कदम आणि समर्थक संचालकांनी या अनियमिततेविरुद्ध तालुका सहकारी संस्था निबंधकांकडे तक्रार केली होती. या प्रकरणास राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तसेच यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्यासमोर मांडण्यात आले. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यवतमाळ यांच्या आदेशानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था उमरखेड यांनी बांधकामावर सखोल चौकशी सुरू केली असून, अहवाल सादर होईपर्यंत काम स्थगित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तक्रारदारांनी संस्थेच्या व्यवस्थापनावर आर्थिक नुकसानीचे आरोप करत सुमारे २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा केला आहे. उमरखेड सहकारी क्षेत्रात या प्रकरणामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले असून, स्थगनादेशामुळे संस्था प्रगतीला खिळ बसल्याची भावना संचालक मंडळात व्यक्त केली जात आहे.

**जिल्हा उपनिबंधक कार्यालयातून पत्र धडकले!**

# सीसीआयच्या कापूस खरेदीत अनियमितता

## झरी जामणीत आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १० मार्च

योगेश मडावी

**झरी जामणी :** तालुक्यातील सीसीआय कापूस खरेदी केंद्रांवरील अनियमित कारभारामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करत तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप उर्फ लक्ष्मण भाऊराव बुर्रेवार यांनी पंतप्रधान Narendra Modi व खासदार प्रतिभा धानोरकर यांना निवेदन पाठवून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

झरी जामणी तालुक्यात सूर्दापूर व मुकुटबन येथे सीसीआयची दोन कापूस खरेदी केंद्रे कार्यरत आहेत. मात्र मागील काही दिवसांपासून या केंद्रांवर कापूस खरेदी वारंवार बंद ठेवणे तसेच स्लॉट बुकिंग सुरू-बंद करण्याचे



प्रकार सुरू असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचा कापूस विक्रीसाठी प्रलंबित राहिला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मिळालेल्या माहितीनुसार 20 फेब्रुवारी ते 8 मार्च या कालावधीत अनेक दिवस खरेदी बंद ठेवण्यात आली. सुमारे 25 दिवसांच्या कालावधीत केवळ 16 दिवस खरेदी झाली असून दोन्ही जिन मिळून फक्त 7 हजार 885 क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली आहे. अनेक वेळा "कापूस खराब आहे" असे कारण देत शेतकऱ्यांचा कापूस परत पाठविण्यात येत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात बाजार समिती सभापती राजीव कासावार यांच्याशी चर्चा केली असता स्लॉट बुकिंग सुरू किंवा बंद करण्याचा अधिकार सीसीआय अधिकाऱ्यांकडे असल्याचे

### खासदार धानोरकर यांच्या हस्तक्षेपाने स्लॉट बुकिंगचा मार्ग मोकळा

■ आज दिल्ली येथे अधिवेशन सुरू असतानाही खासदार Pratibha Dhanorkar यांनी सीसीआय केंद्र प्रमुखांशी दूरध्वनीवर संपर्क साधून स्लॉट बुकिंग सुरू करण्याबाबत चर्चा केली. त्यांच्या या हस्तक्षेपामुळे झरी जामणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी स्लॉट बुकिंगचा मार्ग मोकळा झाला असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार, असे तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप बुर्रेवार यांनी सांगितले.

त्यांनी सांगितल्याचे बुर्रेवार यांनी नमूद केले. मात्र सीसीआय कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. केंद्र सरकारने कापूस खरेदीची मुदत 15 मार्चपर्यंत वाढविली असली तरी शेवटच्या बोंडापर्यंत कापूस खरेदी सुरू ठेवावी तसेच प्रत्येक जिनमध्ये दररोज किमान 2000 क्विंटल कापूस खरेदीची मर्यादा निश्चित करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान, दोन दिवसांत समस्या सोडविण्यात आली नाही तर शेतकऱ्यांच्या वतीने रस्ता रोको आंदोलन किंवा उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन सादर करताना प्रकाश कासावर, प्रकाश मैकलावर, भगवान चुकूलवार, विठ्ठल गिज्जेवार, सुरेंद्र गेडाम, गंगाधर आत्राम, सुभाष कुडमते, नागोराव उरवते, मिथुन सोयम व काँग्रेस कमिटीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# महिलांनी आत्मसन्मानाने पुढे जावे

प्रतिनिधी १० मार्च

**घाटंजी :** पंचायत समिती अंतर्गत पारवा येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी कन्या शाळेत जागतिक महिला दिन विविध उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थिनी व माता-पालकांनी विविध वेशभूषा आणि सादरीकरणातून स्त्रीशक्तीचा गौरव केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारवा ग्रामपंचायतीच्या सरपंचा संगीताताई मडावी तर उद्घाटक म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा उषाताई चौधरी उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पारवा पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस कर्मचारी रंजना मसराम तसेच आरोग्य विभागाच्या प्रतिनिधी एस.



टी. घोडाम व निमा इंदूरकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी बोलताना सरपंचा संगीताताई मडावी यांनी महिलांनी आत्मसन्मानाने आणि आत्मविश्वासाने जीवनात पुढे जावे, असे सांगत महिला दिन हा स्त्रीशक्तीचा गौरव करणारा दिवस असल्याचे प्रतिपादन केले. तसेच उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी महिला पोलीस कर्मचारी रंजना मसराम यांनी महिला सक्षमीकरण, महिलांची सुरक्षितता, त्यांचे अधिकार व कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले. आरोग्य विभागाकडून महिलांनी आरोग्याची काळजी घेण्याविषयी माहिती देण्यात आली, तर पर्यावरण संवर्धनाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रातील प्रेरणादायी भूमिका साकारल्या. मनस्वी बिरकुरवार (सैनिक), अर्णवी आरेवार (डॉक्टर), अर्पिता कुत्तरमारे (अभियंता), सना सय्यद (वैमानिक), आलिया शेख (शिक्षिका), अनुश्री बल्लूरवार (माता रमाबाई), मानसी इसपाडे, अमृता बोगावार (वैज्ञानिक) व निकिता तोडसाम (महिला शेतकरी) यांच्या वेशभूषा व सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाला माता-पालक व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शालेय पोषण आहाराच्या मदतनीस यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक शिक्षक प्रशांत भेदूरकर यांनी केले तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका कु. गीता मानकर यांनी मानले.

# स्मार्ट कार्डसाठी महिलांच्या रांगा

## एसटीच्या सवलतीसाठी नवी अट

प्रतिनिधी १० मार्च

**यवतमाळ :** एसटी बसप्रवासात महिलांना मिळणाऱ्या ५० टक्के सवलतीसाठी 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) अर्थात स्मार्ट कार्ड सक्तीचे करण्यात आल्याने यवतमाळ बसस्थानकात महिलांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र सोमवारी दिसून आले. कार्ड काढण्यासाठी ग्रामीण भागातून आलेल्या महिलांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याने प्रवाशांत नाराजी व्यक्त होत आहे.

राज्य शासनाने २०२३ पासून 'महिला सन्मान योजना' सुरू करून एसटी बसप्रवासात महिलांना भाड्यात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला असून महिलांच्या प्रवासातही वाढ झाल्याचे दिसून आले आहे.दरम्यान, डिजिटल व्यवहाराला चालना देण्याच्या उद्देशाने एसटी



महामंडळाने अलीकडे एनसीएमसी प्रणाली लागू केली आहे.

या स्मार्ट कार्डसाठी सुमारे १९९ रुपये शुल्क आकारले जात असून त्यामध्ये ठरावीक रक्कम शिल्लक ठेवणे आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे यापूर्वी ओळखपत्र दाखवून सवलतीत प्रवास करणाऱ्या महिलांना आता स्मार्ट कार्ड काढणे आवश्यक झाले आहे.या पार्श्वभूमीवर यवतमाळ बसस्थानकात कार्ड काढण्यासाठी महिलांची मोठी गर्दी होत असून उन्हात उभे राहून दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार महिलांनी केली. सवलतीच्या नावाखाली कार्डसाठी शुल्क आकारले जात असल्याने नाराजीही व्यक्त होत आहे. कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करावी तसेच बसस्थानकांवर अतिरिक्त काउंटर सुरू करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी महिलांकडून करण्यात येत आहे.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. १० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# फोकस

● अतिष देशमुख @ वाशीम ●




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले. शहरातून जाणारा अकोला - नांदेड रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरीच होत आहे. जिल्ह्यात एमआयडीसी भकास झाली असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे. जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून असलेला कलंक पुसण्यासाठी आलेला निधीही भ्रष्टअधिकाऱ्यांमुळेच खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. लोकप्रतिनिधींनीही काहीच केले नाही .

# कधी मिळणार न्याय जिल्ह्यावर अन्याय !



* रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी
* भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर
* अमरावती विद्यापिठ उपकेंद्राची लढाई व्यर्थ
*नदीजोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळला




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.




# जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर...

मागास जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. याविरोधात जिल्ह्यातील आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी दिखावा म्हणुन तीव्र विरोध केला. तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उद्घाटन संपन्न झाले. आता साप गेल्या नंतर काडया मारण्यात काय अर्थ अशी चर्चा होत आहे. खुदद नितिन गडकरींनीही जिल्हयातील अधिका-यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेमुळे व लोकप्रतिनिधीच्या निष्कीये ते मुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा जाहिर सभेत म्हटले आहे.

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये




वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक असून आमदार, खासदार आजी माजी हे नेते पुढे आले. त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे माध्यमांना सांगितले होते. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनाही तात्पूर्ते आंदोलन करून विरोध दर्शविला. मात्र, त्यामधून काही मार्ग निघाला नाही.

# सिंचनाचा भ्रष्टाचार निवळला, नदीजोड प्रकल्पातून जिल्हा वगळला...




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द



प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश होता मात्र, ६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात वाशिम जिल्ह्याचा उल्लेख नाही. त्यामुळे आकांक्षीत जिल्ह्याचा डाग पुसण्याच्या बाता करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे गेले.




## अमरावती विद्यापिठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे कायम...

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ५ (८)अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक नियोजनासाठी उपकेंद्र उभारणे बंधनकार आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेला ३९ वर्षे होऊनसुद्धा विद्यापीठ प्रशासनाने आपले उपकेंद्र सुरू केले नाही. दरम्यान, वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या सिनेट सभेमध्ये झाला होता. त्याला उच्च व तंत्र शिक्षण विभागानेसुद्धा तत्वतः मान्यतही दिली होती.लोकप्रतिनिधींनी या संबंधि पुढाकारही घेतला होता. मात्र घोडे कुठे आडले तरी सुध्दा उपकेंद्राचा प्रश्न अद्यापही कायमच आहे.लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी उपकेंद्रासाठी उभी केलेली चळवळ थंडबस्त्यात पडली आहे.




## वाशीम येथे विद्यापिठ उपकेंद्राला तत्वता मान्यता मिळाली होती...

वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, याला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून १ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शिवाय उपकेंद्रासाठी १७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, ६० कोटींचा खर्च अपेक्षित आहे हे सुद्धा यात ठरले. हा प्रस्ताव वित्त व संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला. १५ वर्षांपासून तो रेंगाळला आहे. दरम्यान, बांधकामाच्या साहित्याचे भाव आणि कर्मचाऱ्यांचे पगारही वाढले. त्यामुळे आता हा खर्च ३०० कोटींपेक्षाही अधिक होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रखडला आहे. तर दुसरीकडे विद्यापिठ उपकेंद्र अकोल्याला होणार असल्याने पुन्हा एकदा वाशीम जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. तरी सुध्दा उपकेंद्रासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना निद्रावस्थेत असून त्यांना जिल्ह्याच्या विकासाचे काहीच घेणे देणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. १० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# शेतकरी कर्जमाफी; शासन आदेशाची प्रतीक्षा !

## कर्जमाफीबाबत संदिग्धता;नियम व अटींची स्पष्टता नाही



प्रतिनिधी १० मार्च

**अकोला :** राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफीची घोषणा नुकतीच केली. त्यामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची मात्र घोर निराशा झाली आहे. कारण आतापर्यंत दोन्ही कर्जमाफीचा त्यांना कोणताच फायदा झाला नाही. तसेच ही कर्जमाफीची घोषणा झाली असली तरी ही कर्जमाफी मिळण्यासाठी पात्र शेतकरी कोणते असणार, केवळ दोन लाखांपर्यंतचे थकीत कर्ज माफ होणार की त्यावरील व्याजही माफ होणार, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. याबाबत अधिकारी वर्ग ही अनभिज्ञ असून, शासन आदेशात कर्जमाफीच्या नियम व अटींबाबत स्पष्टता असणार असल्याने सर्वांनाच शासन आदेशाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

जिल्ह्यातील जवळपास ९० हजार ६८८ शेतकरी थकबाकीदार असून त्यांच्याकडे १ हजार ६९ कोटी ६४ लाख रूपयांचे पीककर्ज थकीत आहे. त्यांना दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ होणार आहे. मात्र यातील पात्र शेतकरी कोणते ही कर्जमाफी योजनेच्या अटी व शर्तीनंतरच निश्चित होणार आहे. तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन रक्कम दिली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. जिल्ह्यात सप्टेंबर २०२५ पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँका, खासगी व्यापारी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखांमधून ९० हजार ६८८ शेतकऱ्यांनी जवळपास १ हजार ६९ कोटी ६४ लाख रूपयांचे कर्ज घेतलेले आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेच्या सूत्रांनी दिली आहे. तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ५० हजार रूपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ मिळणार आहे. शेतकरी सातत्याने कर्जबाजारी होऊ नये म्हणून अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'मित्रा' या शासकीय संस्थेचे अध्यक्ष प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती.

### आतापर्यंत तीन वेळा झाली कर्जमाफी

बहुतांश शेती ही निसर्गाच्या भरवशावर अवलंबून असल्यामुळे दरवर्षी नैसर्गिक संकटांमुळे शेती तोट्याची ठरत आहे. त्यातच कृषी निविष्ठांचे वाढलेले दर आणि शेतमालाचे राहिलेले जैसे थे दर हेही शेतकरी कर्जबाजारी होण्याची प्रमुख कारणे आहेत. यामुळे २००८ मध्ये मनमोहनसिंग सरकारने राष्ट्रीय स्तरावर शेतकरी कर्जमाफी केली होती. त्यानंतर २०१७ व आता २०२४ अशी आतापर्यंत तीन वेळा कर्जमाफी झाली आहे. त्यामुळे यावर कायमस्वरूपी उपाययोजना अंमलात आणण्याची गरज आहे. अन्यथा 'कर्ज घ्या अन् माफी मिळवा' अशीच शेतकऱ्यांची गत होणार आहे.

# नगररचना विभागाच्या कार्यपद्धतीवर सत्ताधारी आक्रमक

## सभागृह नेते पवन महल्ले यांचा अधिकाऱ्यांना गर्भित इशारा

प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** महानगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहराशी संबंधित विविध विकासकामांवर चर्चा रंगली असतानाच, नगररचना विभागाच्या कारभारावरून सत्ताधारी पक्षाने प्रशासनाला धारेवर धरले. सभागृह नेते पवन महल्ले यांनी या विभागाच्या कार्यप्रणालीवर तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांना कडक शब्दांत तंबी दिली.

महानगरपालिकेच्या सभेत आज शहराच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. या सभेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे स्थायी समिती सभागृह नेते पवन महल्ले यांनी नगररचना विभागाला दिलेला इशारा. नियमांना बगल देऊन काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी यावेळी दिला. महानगरपालिका सभेदरम्यान विविध विषयांवर चर्चा सुरू असताना पवन महल्ले यांनी नगररचना विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शहरातील बांधकामे आणि इतर तांत्रिक मंजुऱ्या देताना पारदर्शकता राखली जात नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. पवन महल्ले यांनी अधिकाऱ्यांना सज्जड दम भरताना म्हटले की, 'शहरात कोणतेही काम नियमांच्या बाहेर होता कामा नये. जर कोणत्याही अधिकाऱ्याने नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने काम केले, तर त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.' जनतेच्या हितासाठी आणि शहराच्या शिस्तबद्ध विकासासाठी नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी यावेळी ठामपणे सांगितले. अकोल्याच्या विकासावर भर देत त्यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. आक्रमक भुमिका त्यांनी घेतलेली दिसून आली. आता अकोलाचा विकास वेगाने व्हावा अशी अपेक्षा देखील त्यांीन व्यक्त केली.



### महानगरपालिका सभेत वंचित बहुजन आघाडी आक्रमक नगरसेवक निलेश देव यांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले



**अकोलाः** महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज विविध मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळाला. वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक निलेश देव यांनी अनेक नागरी प्रश्नांवरून प्रशासकीय आणि सत्ताधारी गटाला धारेवर धरत आपली भूमिका परखडपणे मांडली. महानगरपालिका सभेत आज विविध प्रलंबित मुद्द्यांवरून चांगलीच खडाजंगी पाहायला मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक निलेश देव यांनी अनेक विषयांवर सत्ताधारी पक्षाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सत्ताधारी पक्ष केवळ बहुमताच्या जोरावर निर्णय घेत असून लोकशाही मूल्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका त्यांनी यावेळी केली. महानगरपालिकेच्या सभेदरम्यान शहराशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर वंचित बहुजन आघाडीचे निलेश देव यांनी आक्रमक पवित्रा घेतला. सभेच्या सुरुवातीपासूनच काही मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि निलेश देव यांच्यात तीव्र शाब्दिक चकमक उडाली. निलेश देव यांनी आरोप केला की, 'सत्ताधारी पक्ष अनेक महत्त्वाचे निर्णय घेताना केवळ आपल्या बहुमताचा वापर करत आहे. विरोधी पक्षाने मांडलेले प्रश्न किंवा सूचना यांना पुरेसे महत्त्व दिले जात नाही.' त्यांनी पुढे स्पष्ट केले की, जनतेच्या हिताचे निर्णय घेताना सर्व पक्षांच्या मतांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, मात्र सध्या तसे होताना दिसत नाही. या गदारोळामुळे सभागृहातील वातावरण काही काळ चांगलेच तापले होते.

# न्यू तापडिया नगर उड्डाणपुलासाठी १०४ कोटींचा सुधारित आराखडा मंजूर

## आमदार रणधीर सावरकरांच्या पाठपुराव्याला यश



प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** शहराच्या विस्तारासाठी आणि उपनगरांना मुख्य शहराशी जोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या न्यू तापडिया नगर रेल्वे उड्डाणपुलाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. गेल्या आठ वर्षापासून हा उड्डाणपुल होतो की नाही अशी शंका असताना आता राज्य सरकारने सुधारीत प्रस्तावाला मान्यता दिली आहे. गेल्या आठ वर्षापासून न्यू तापडीया उड्डाणपुल होत असल्याची ओरड आहे. पण, तो कधी पुर्ण होईल अशी विचारणा सर्वत्र आहे. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी १०४.७९ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला मान्यता दिली आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षापासून रखडलेले या पुलाचे काम आता युद्धपातळीवर पूर्ण होईल.

अकोला शहरातील सातव चौक ते न्यू तापडिया नगर दरम्यान हा उड्डाणपूल बांधला जात आहे. मध्य आणि दक्षिण रेल्वेच्या रेल्वे मार्गामुळे घुसर-खरप भागातील वाहतूक वारंवार विस्कळीत होत असे. या पुलामुळे सुमारे ६० हजार नागरिकांना रोजचा या फटका या ठिकाणी बसत आहे. उड्डाणपुलाच्या या कामासाठी आमदार रणधीर सावरकर यांनी सातत्याने राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता. सुरुवातीला हा प्रकल्प ५० कोटी रुपयांचा होता, मात्र रेल्वे विभागाचा बदललेला आराखडा, 'व्हायाडक्ट' आणि 'आरई वॉल'च्या लांबीतील वाढ, सेवा रस्त्यांच्या खर्चात झालेली वाढ, यामुळे खर्चाचा आकडा १०४.७९ कोटींवर पोहोचला आहे.खासदार अनुप धोत्रे यांनी रेल्वे विभागाकडून तातडीने सुधारित आराखड्याला मंजुरी मिळवून घेतली, तर आमदार सावरकर यांनी मुख्यमंत्री आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा करून वाढीव निधी मंजूर करून घेतला.

### जागतिक महिलादिनानिमित्त महिलांसाठी विशेष रोजगार मेळावा

**अकोला :** जिल्हा रोजगार मार्गदर्शन केंद्रातर्फे जागतिक महिलादिनानिमित्त महिलांसाठी पं. दीनदयाळ उपाध्याय विशेष रोजगार मेळावा दि. १० मार्च रोजी सकाळी ११ वा. डॉ. आनंदीबाई जोशी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होईल.

त्यात पाच नामांकित कंपन्यांतर्फे १५४ पदांची भरती होणार आहे. दहावी, बारावी, एएनएम, जीएनएम उमेदवारांना संधी आहे. इच्छूकांनी मेळाव्यास कागदपत्रांसह उपस्थित राहावे. ro®ar.mahaswayamed.goved.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संपर्क :

# शहरातील विविध प्रभागात कचराकुंडीचे वितरण



प्रतिनिधी १० मार्च

**तेल्हारा:** नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छ व सुंदर शहर ठेवण्याच्या उद्देशाने शहरातील विविध प्रभागामध्ये नागरिकांना नगराध्यक्षा वैशालीताई पालिवाल यांच्या उपस्थितीत रविवार पासून कचराकुंडीचे वितरण उपक्रमांतर्गत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना ओला कचरा वेगळा ठेवण्याबाबत जनजागृती करण्यात आली. शहर स्वच्छतेसाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून कचराकुंडीचा योग्य वापर करावा, असे आवाहन नगराध्यक्षा. वैशाली पालीवाल यांनी यावेळी केले. नगरपरिषद स्वच्छता विभागाच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असून स्वच्छता अभियानाला चालना मिळणार आहे. या प्रसंगी सतीश जयस्वाल, अरुणा ठाकरे, विजयसिंह बलोदे, प्रशांत विखे, भक्ती छांगाणी, अमित अग्रवाल, साक्षी वानखडे, संध्याताई गावत्रे, रुपेश चव्हाण, मंगेश ठाकरे यांच्यासह जितेंद्र पालिवाल, छोटु गावत्रे, प्रभाकर पवार, राजेश पालिवाल, पिंटू मुरकटे दीपक इंगळे, चेतन जयस्वाल, यांच्यासह स्वच्छता विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जागतिक महिला दिनानिमित्त अंगणवाडी सेविकांचा सन्मान

**अकोला :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन जिल्ह्यातील आदर्श अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांनी उल्लेखनीय कार्याबद्दल उत्कृष्ट कार्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी माया शिर्के, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) मिलिंद मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रविकांत पवार, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजश्री कोलखेडे, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे आदी उपस्थित होते. अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, कर्मचा-यांचे विविध योजना-उपक्रमांच्या अंमलबजावणीत मोठे योगदान आहे.

# अमृतवाडीत डायरेक्ट फॅक्टरी सेलचा धमाका !

## कार्डिन कंपनीच्या सेलची जोरदार चर्चा




प्रतिनिधी १० मार्च

**अकोला:** सर्व फॅशन प्रेमी महिला, पुरुष आणि तरुणाईमध्ये सध्या जगप्रसिद्ध 'कार्डिन' कंपनीच्या सेलची जोरदार चर्चा सुरू आहे. आगामी लग्नसराई आणि सणासुदीचे दिवस लक्षात घेता, शहरात अमृतवाडी येथे कार्डिन कंपनीचा भव्य 'डायरेक्ट फॅक्टरी सेल' सुरू झाला आहे.

फॅशनच्या दुनियेत 'कार्डिन' हा एक प्रस्थापित ब्रँड असून, विशेषतः तरुणांमध्ये या ब्रँडच्या कपड्यांची मोठी क्रेझ आहे. या सेलमध्ये सर्व प्रकारचे रेडिमेड कपडे एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत.पुरुषांसाठी जीन्स पॅंट, टी-शर्ट, फॉर्मल शर्ट आणि पॅंट, १००३ कॉटन शर्ट, स्टायलिश ट्राउझर आणि लग्नसराईसाठी आकर्षक कुर्ते. महिलांसाठी विविध प्रांतांतील प्रसिद्ध साड्यांचा खजिना कांजीवरम, बनारसी, पैठणी, गढवाल, मंगलागिरी आणि कांचीपट्टू.



### धमाका ऑफर्स फक्त पुरुषांच्या ब्रँडेड कपड्यांवर

एक खरेदी करा एक मोफत मिळवा, दोन खरेदी करा तीन मोफत मिळवा, तीन खरेदी करा पाच मोफत मिळवा.
इतक्या माफक दरात ब्रँडेड कपडे मिळत असल्यामुळे पहिल्या दिवसापासूनच ग्राहकांनी खरेदीसाठी प्रचंड गर्दी केली आहे. फॅशन प्रेमींना ही स्वस्त आणि दर्जेदार खरेदीची सुवर्णसंधी मिळत आहे. त्वरा करा! स्टॉक संपण्यापूर्वीच आपल्या आवडीच्या कपड्यांची मनसोक्त खरेदी करण्यासाठी आजच अमृतवाडीतील 'कार्डिन सेल'ला भेट द्या असे आवाहन केले आहे.

# नवख्या नगरसेवकांना मनपाच्या कामकाजाच्या प्रशिक्षणाची गरज !

## पहिल्याच सभेत नवख्या महिला नगरसेवक गोंधळलेल्या स्थितीत

विजय चव्हाण १० मार्च

**अकोला:** सोमवारी अकोला महापालिकेची सर्वसामान्य सभा पार पडली. परंतु या सभेत नव्यानेच निवडून आलेल्या अनेक नगरसेवकांना विशेषतः महिला नगरसेवकांना आपल्या प्रभागातील प्रश्न कसे मांडावेत हा प्रश्न पडला होता. कारण सभा सुरू होताच सत्ताधारी आणि विरोधकातील जुन्या जाणत्या नगरसेवकांनीच एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाची सरबत्ती करून सभेचा ताबा घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे नव्याने निवडून आलेल्या अनेक नगरसेवकांना प्रभागातील समस्या मांडण्याची संधीच मिळाली नाही. तीन साडेतीन वर्षाच्या प्रशासकीय कारभारानंतर महानगरपालिकेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत भाजप सलग तिसऱ्यांदा सत्तेत आले. मात्र त्यांना बहुमतासाठी अपक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसची मदत घेणे भाग पडले. निवडणूक होऊन दीड महिन्यांहून अधिक काळ लोटला मनपातील विशेष समित्यांनी पदभार स्वीकारल्यानंतरही मनपा चा गाडा प्रशासकीय राजवटीतून बाहेर न पडल्याचे चित्र आजही दिसून येत आहे. निवडणुकीपूर्वी प्रभागातील प्रत्येक गल्लीत पोहोचण्यासाठी उत्सुक असलेले उमेदवार निवडून आल्यानंतर मात्र प्रभागात फारसे दिसत नसल्याची चर्चा सुरू आहे. परंतु सोशल मीडियावर विविध व्हिडीओ पोस्ट करून स्वतः प्रभागात सक्रिय असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न काही नगरसेवकांकडून होत आहे.

निवडून आलेल्या ८० नगरसेवकांपैकी ५०३ हून अधिक नगरसेवक प्रथमच निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना मनपातील कामकाजाची पद्धत अजून पूर्णपणे समजलेली नाही. प्रभागातील समस्या मांडण्यासाठी काही मोजके नगरसेवक अधिकाऱ्यांना भेटताना दिसतात; परंतु बहुतेक नगरसेवक विशेष सभा, निवडणुका आणि बैठकींपुरतेच मर्यादित असल्याचे दिसून येते. काही बांधकाम व्यावसायिकांनाही यावेळी राजकीय पक्षांनी उमेदवारी दिली त्यामुळे प्रभागातील बांधकामाचे ठेके आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी हे नगरसेवक प्रयत्न करीत आहेत. स्थायी समिती आणि विविध विशेष समित्यांच्या सदस्यांची घोषणा करण्यासाठी आयोजित विविध सभेतही नगरसेवकांची उशिरा उपस्थिती स्पष्टपणे दिसून आली. विरोधी पक्ष नगरसेवक वेळेवर पोहोचले होते. परंतु सत्ताधारी पक्षाचे काही नगरसेवक उशिरा येताना दिसले. महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या वेळी सर्वांनाच वेळेवर उपस्थित राहण्याचे बजावले होते. वेळेला महत्त्व न देणारे हे नगरसेवक आपल्या प्रभागातील जनतेला किती वेळ देतील हे येणारा काळच ठरवेल. अनेक नगरसेवक जनतेमध्ये दिसण्याऐवजी स्वतः कार्यालयाबाहेर किंवा घरा समोर लावलेल्या अवैध कटआउट पोस्टरवरच अधिक दिसत असल्याची टीका होत आहे. नवे नगरसेवक जनतेमध्ये जाण्याऐव सोशल मीडियावर रील्स व व्हिडीओ टाकण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे जनतेची कामे वरिष्ठ नगरसेवकांनाच करावी लागत आहेत. इतर प्रभागांमधूनही नागरिकांचे समस्यांबाबत फोन येत असून त्यांची कामेही आम्हाला पाहावी लागत आहेत. असे अनेक वरिष्ठ नगरसेवकांचे म्हणणे आहे. मनपात कार्यरत एका सफाई कर्मचाऱ्यांनी सांगितले की प्रशासकीय काळात एकही नगरसेवक घराबाहेर पडत नव्हता कचरा किंवा जनतेच्या समस्या त्यांना दिसत नव्हत्या. आजही परिस्थिती तीच आहे. अनेक नवीन नगरसेवकांना अद्याप महापालिकेचे कामकाज कसे चालते हेच कळत नाही त्यामुळे अशा नवीन नगरसेवकांना महापालिकेच्या कामकाजाबाबत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे जेणेकरून त्यांना आपल्या प्रभागातील समस्या सभागृहात मांडण्यास मदत होईल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135